राज्यात कोरोना विषाणू (COVID-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यास्तव राज्यातील सर्व रास्तभाव दुकानांमध्ये घ्यावयाची दक्षता

महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०२०/प्र.क्र. ५६ /सं.क.

मादाम कामा मार्ग, राजगुरू हुतात्मा चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

तारीख: १५ एप्रिल, २०२०

शासन परिपत्रक:-

जगभरात सर्वत्र पसरत असलेला नविन कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव व त्याच्या संसर्गाने बाधित होणाऱ्या रुग्णांची संख्या लक्षात घेता जागतिक आरोग्य संघटनेने आरोग्यविषयक आंतरराष्ट्रीय आपत्ती जाहिर केलेली आहे. या विषाणूचा प्रादुर्भाव रोखणे व प्रतिबंधीत उपाययोजना यासाठी जागतिक आरोग्य संघटना व आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून दैनंदिन स्वरुपात सूचना देण्यात येत आहेत.

२. महाराष्ट्र राज्यातही कोरोनाबाधित रुग्ण आढळल्याने आजारास प्रतिबंध व नियंत्रण यासाठी तातडीच्या व आपत्कालीन उपाययोजना सुरु करण्यात आलेल्या आहेत. यात रुग्ण शोध मोहिम, रुग्णांचे विलगीकरण व एकंदरच विषाणू आजार प्रतिबंध व नियंत्रण या बाबींचा समावेश आहे. तसेच साथरोग अधिनियम, १८९७ मधील तरतूदी लागू करण्यात आलेल्या आहेत. या परिस्थितीत राज्यातील कोरोनाबाधित रुग्णसंख्या आटोक्यात ठेवणे, प्रादुर्भाव रोखणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी शासनामार्फत वेळोवळी सूचना देण्यात आल्या आहेत.

३. या पार्श्वभूमीवर, राज्यात कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून रास्तभाव दुकानातून शिधावस्तुचे वितरण करताना लाभार्थ्यांची बायोमेट्रीक पडताळणी न करता रास्तभाव दुकानदारांनी स्वत:चे आधार अधिप्रमाणीत करुन धान्य वाटपाची सुविधा दिनांक ३१ मार्च, २०२० रोजीच्या शासन परिपत्रकान्वये दि.१५ एप्रिल, २०२० पर्यत ई-पॉस उपकरणांवर उपलब्ध करुन देण्यात आली होती. परंतू कोरोना विषाणूंचा प्रसार व राज्य शासनाने दि.०३ मे, २०२० पर्यत लॉक-डाऊनचे दिलेले निर्देश विचारात घेता सदर सुविधा पूढील आदेश येईपर्यंत सुरु ठेवण्यात येत आहे.

४. उपरोक्त सुविधेद्वारे लाभार्थ्यांना धान्य वाटप करताना रास्तभाव दुकानदारांनी खालील दक्षता घेणे आवश्यक आहे:

अ) अन्नधान्य घेण्याकरिता रास्तभाव दुकानात आलेले पात्र शिधापत्रिकाधारक यांनाच रास्तभाव दुकानदारांनी स्वतःचे आधार अधिप्रमाणित करून अन्नधान्याचे वाटप करावे.

आ) शिधापत्रिका धारकाच्या गैरहजेरीत कोणतेही अन्नधान्य वाटपाचे व्यवहार करु नयेत.

इ) ई-पॉस उपकरणाद्वारे अन्नधान्य वितरणानंतर उपकरणामधून आलेली व्यवहाराची पावती लाभार्थ्याला देणे रास्तभाव दुकानदारांना बंधनकारक आहे.

ई) ई-पॉस उपकरणांवर पोर्टेबिलिटीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या सुविधेचा वापर करताना धान्याचा अपहार / अनियमितता होणार नाही याची दक्षता रास्तभाव दुकानदारांनी घ्यावी. तथापि, वाटप केलेल्या धान्याची जबाबदारी रास्तभाव दुकानदार यांची राहील.

उ) कोरोना विषाणूचा प्रसार होऊ नये याकरिता केंद्र शासनाने व राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे व मार्गदर्शक सुचनांचे पालन करावे.

५. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, अधिपत्याखालील रास्तभाव दुकानदारांना योग्य त्या सूचना संबंधित क्षेत्रीय कार्यालयांनी देण्यात याव्यात. या सुविधेचा गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर नियमानुसार उचित कारवाई करण्यात यावी. तसेच कोणताही पात्र लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहु नये, याबाबतची दक्षता घेण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(स.श्री.सुपे)
शासनाचे सह सचिव
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रत,

१) सर्व विभागीय आयुक्त,
२) नियंत्रक (शिधावाटप) व संचालक नागरी पुरवठा,मुंबई,
३) सर्व जिल्हाधिकारी,
४) मा. मंत्री, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
५) मा. राज्यमंत्री, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, यांचे खाजगी सचिव,
६) सर्व उप आयुक्त (पुरवठा),
७) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी,
८) सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी,
९) सर्व उपनियंत्रक शिधावाटप,
१०) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई,
११) उप संचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई.
१२) सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
१३) सर्व सह सचिव/अवर सचिव/सर्व अधिकारी,अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई,
१४) निवड नस्ती (सं.क.)